Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# परिपत्रक

विषय - शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागामध्ये नियुक्त केलेल्या हंगामी शिक्षकांना उजाळा, उद्‌बोधन वर्ग, चर्चासत्र, परिषद, कार्यशाळा, FDP, STP किंवा प्रशिक्षण अभ्यासक्रमांना पाठविण्याबाबत.

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग/स्कूल/केंद्र येथे कार्यरत असणारे हंगामी शिक्षक हे विविध विद्यापीठामार्फत अथवा महाविद्यालयामार्फत आयोजित करण्यात आलेल्या उजाळा, उद्‌बोधन वर्गासाठी, चर्चासत्र, परिषद, कार्यशाळा, FDP, STP किंवा प्रशिक्षण अभ्यासक्रमांना उपस्थित राहण्यासाठी परवानगी मिळणेबाबत अर्ज करत असतात.

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागामध्ये नियुक्त केलेल्या हंगामी शिक्षकांना उजाळा, उद्‌बोधन वर्ग, चर्चासत्र, परिषद, कार्यशाळा, FDP, STP किंवा प्रशिक्षण अभ्यासक्रमांना एका शैक्षणिक वर्षामध्ये जास्तीत जास्त १० दिवसाच्या कालावधीसाठी पाठविण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले विद्यापीठ पत्र क्र. एसयु/आस्था/पीजी/२९४६, दि. १०/०७/२०१२ अन्वये हंगामी शिक्षकांना उजाळा, उद्‌बोधन वर्ग, चर्चासत्र, परिषद, कार्यशाळा, FDP, STP किंवा प्रशिक्षण अभ्यासक्रमांना पाठविण्यासाठीचा कालावधी हा कार्यरत "On Duty" कालावधी म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

तरी अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक यांनी सदरची बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावी व प्राप्त होणारे अर्ज / प्रस्ताव योग्य त्या कारणमिमांसेसह व शिफारशीसह प्रशासनाकडे अग्रेषित करण्याबाबत पुढील उचित कार्यवाही करावी.

जा.क्र. आस्थापना/पीजी/ 2845

दिनांक : 30 MAR 2024

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

प्रति,

अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक,
सर्व अधिविभाग/स्कूल/केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

प्रत- माहितीसाठी

१. मा. कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या कार्यालयास
२. मा.प्र-कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या कार्यालयास
३. मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या कार्यालयास
४. मा. अधिष्ठाता, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या कार्यालयास
५. महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.